# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/10/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## जनावरे चोरी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ११ कि.मी. अंतरावरील मौजा पीपरडोल उमरेड येथे दिनांक १५/१०/२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक १६/१०/२०२३ चे सकाळी ०४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शालीक नत्थु उके, वय ६९ वर्ष, रा. पीपरडोह ता. उमरेड जि. नागपूर यांनी शेतीचे काम करण्यासाठी गौरक्षण सुराबर्डी चारगाव येथुन एक पांढऱ्या रंगाचा बैल वर्षाचे ३५००/— रू. किरायाने असा या वर्षी घेतला होता तसेच फिर्यादीकडे एक गाईचे गोरे पांढऱ्या रंगाचे वय अंदाजे ५ वर्ष असे होते दिनांक १५/१०/२०२३ रोजी ०५/३० वा. दरम्यान फिर्यादी एक बैल व दोन गोरे फिर्यादीच्या शेतातुन मशागत करून घरासमोर आणुन बांधले की रात्री फिर्यादी घरी जेवन करून रात्री ११/०० वा. सुमारास घराबाहेर येवुन पाहीले असता फिर्यादीचे गुरे ढोरे घरासमोरील अंगणात बांधलेले होते त्या नंतर फिर्यादी आपले घरी जावुन झोपी गेले व दुसरे दिवशी दि. १६/१०/२०२३ रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ०४/३० वा. उठुन घराबाहेर आले असता एक पांढरे रंगाचा बैल व एक व पांढरे रंगाचे गोरे दिसले नाही यावरून फिर्यादीच्या गावाशेजारी व बैलबाजार भरतो त्या ठिकाणी जावुन आपले बैल व गोरं यांचा शोध घेतला असता मिळुन आले नाही. कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीचे घरासमोरून अंगणातील बांधुन ठेवलेला एक पांढरे रंगाचा बैल किंमती १००००/— रू व एक गोरा किंमती १००००/— रू असा एकुण २००००/— रूपयाचा मुद्देमाल चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी ईश्वर जोधे मो क्र ९८२३११५३७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर